
ठाणेवैभव

# जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये फ्लाईट ऑफ फँटसी चित्रप्रदर्शन





**ठाणे:** वंदना कृष्णा यांचे फ्लाई ऑफ फँटसी या संकल्पनेवर आधारित चित्र प्रदर्शन काळा घोडा येथील जहांगीर आर्ट गॅलरी येथे 22 नोव्हेंबरपासून सुरु होत असल्याची माहिती सुप्रसिद्ध चित्रकार आणि साहित्यिक विजयराज बोधनकर यांनी दिली आहे.

वंदना कृष्णा यांनी शहरातल्या दृश्य भाषेला रंगभाषेतून आपल्या कॅनव्हासवर परावर्तित करतांना त्यांनी फॅन्टसीचा सुंदर वापर केला आहे. रंग, रेषा, आकार आणि अवकाश याची भाषा त्यांना अवगत झालेली दिसते. भविष्यात त्यांचा हा प्रवास अमूर्ततेकडे सरकताना दिसतो. व्हॅनगोअग, मोनेट, जोहान्स वरमीयर, हेन्री मेरिस, गुस्ताव क्लिमट या पश्चिमी चित्रकाराची चित्रे त्यांना आवडतात तर भारतीय चित्रकारांपैकी एम एफ हुसेन, फ्रान्सिस न्यूटन सुझा, वासुदेव गायतोंडे, यासारख्या ज्येष्ठ चित्रकारांच्या चित्रांचे ते सतत अवलोकन करीत असतात.

वंदना कृष्णा यांचे हे एकल चित्रप्रदर्शन डॉ. अदिती वैद्य यांनी क्युरेट केले असून मुंबईच्या काळा घोडा परिसरात असलेल्या जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये 22 नोव्हेंबर ते 27 नोव्हेंबर 2022 पर्यंत भरणार आहे. सकाळी 11 सायंकाळी 7 वाजे पर्यंत रसिकांसाठी विनामूल्य खुले असेल.